ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– IV July – August, 2023

OPEN ACCESS Original Research Article

# राजन गवस यांच्या कादबां रीतील समाजजीवन

* पांडुरंग गावडे

*बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय वेंगुर्ला

**प्रस्तावना :**

कथा आणि कादंबरी या साहित्यप्रकारात काही समान गुणधर्म असले तरी कथा व कादंबरी हे दोन्ही स्वतंत्र साहित्यप्रकार आहेत. कादंबरी ही विस्तृत भाषिक अवकाश असलेला साहित्यप्रकार आहे. मानवी जीवन हा कदंबरीचा अनुभव विषय आहे. हा अनुभव जसा वास्तव, लौकीक स्वरूपाचा असतो. दर्शन सखोल घडत असते. मराठी कादंबरी क्षेत्रात विविध विषय आणि आशय असलेल्या दर्जेदार कादंबरी लेखनाची परंपरा आहे. विशेषत: राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्याइतपत त्यांचे लेखन झालेले आहे. समाजातील प्रत्यक्ष जगण्याचे प्रश्न आणि त्यातील गुंतागुंत कादंबरी या साहित्य प्रकारात हाताळलेली आहे. राजन गवस हे कादंबरीकार म्हणून १९८० नंतरच्या काळात लिहिणारे महत्त्वाचे कादंबरीकार त्यांच्या चौंडक (१९८५), भंडारभोग (१९८९), धिंगाणा (१९९२), कळप (१९९७), तणकट (१९९८) या कादंबरीतून समकालिन समाज जीवनाचे दर्शन घडविले आहे. त्याहीपुढे जाऊन उपेक्षित अशा विषयांना त्यांनी कादंबरीसारख्या साहित्य प्रकारातून मांडले आहे. कादंबरीसारख्या साहित्य प्रकाराचा पट व्यापक असतो. समाजातील विविध विषयाचा सखोल वेध घेण्याचा प्रयत्न या साहित्यप्रकारातून घेतला जातो. कादंबरी एका विशिष्ट कालात घडलेल्या घटना, प्रसंगाचा व्यक्ती आणि समाजजीवनावर होणाऱ्या परिणामांचा सखोल आढावा घेतलेला असतो. कादंबरीकार समाजाकडे, व्यक्तीकडे, त्यांच्या समस्यांकडे कोणत्या संवेदनशीलतेने अवलोकन करतो आणि ते अवलोकन व्यक्ती आणि समाजाच्या दृष्टीने कशा प्रकारे मांडतो हे कादंबरीच्या जडणघडणीसाठी आवश्यक असते. दुर्लक्षित अशा विषयाला कादंबरीकार कसा व्यक्त करतो यावर कादंबरी वाचकाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते.

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**राजन गवस यांच्या कादंबरीतील समाजजीवन:**

चौंडक (१९८५) ही राजन गवस यांची पहिली कादंबरी. या कादंबरीत अनिष्ट रुढी परंपरेने जगण्यात दु:ख आणि हालअपेष्टा सहन कराव्या लागणाऱ्या देवदासीच्या जीवनाची वास्तव कहाणी कादंबरीच्या रुपाने मांडली आहे. देवदासी म्हणून जगताना समाज आणि त्याच्या रुढी परंपरेने माणूसपण नाकारण्याचे दु:ख या जोगतीनी भोगतात. हे हजारो वर्ष रुढी परंपरेच्या नावाखाली चाललेले शोषण आहे. समाजातील कोणत्याच घटकाला या विषयी खंत नाही. उलट समाजच या रुढींना पोसतो. ही समस्या त्या समस्त समाजाची आहे याचे भान समाजाला नाही. समाज देवाधर्माच्या भोंडस नावाखाली कशाप्रकारे शोषण करतो हे या कादंबरीतून व्यक्त झालेले

आहे. या त्यांच्या पहिल्याच कादंबरीने सामाजिक भान असलेले संवेदनशील कादंबरीकार म्हणून राजन गवस यांची ओळख निर्माण झाली. राजन गवस यांची 'भंडारभोग' (१९८९) ही दुसरी कादंबरी एका पुरुषाच्या आयुष्याचे दु:ख रुढी परंपरेने किती गहन केले आहे याचे दर्शन घडविले आहे. चौंडक आणि भंडारभोग या कादंबरीतून राजन गवस यांनी या गभींर प्रश्नाकडे वाचकाचे मन वेधले.

महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्याच्या समाजावर झालेला प्रभाव त्यांनी त्यांच्या या दोन्ही कादंबरीतून मांडला आहे. वर्षानुवर्षे चालत आलेल्या समाजाच्या रुढी परंपरा आणि त्याला धर्माचा आधार देवून देवदासी, जोगत्यांच्या दु:खाचे शोषणाचे दर्शन तटस्थपणे मांडून एक प्रभावी संवेदनशील कादंबरीकार अशी ओळख निर्माण केली. कर्नाटक महाराष्ट्र सीमाभागात विशेषत: या ग्रामीण भागात राजकीय रंग कशा पद्धतीने मुरले आहेत याचे दर्शन त्यांच्या धिंगाणा (१९९२) या कादंबरीतून व्यक्त झाले आहे. ग्रामीण भागातील तरुणांना दिशाहीन करुन त्यांच्या आयुष्याशी कशा प्रकारे राजकीय पक्ष आणि नेतेमंडळी खेळतात याचे दर्शन त्यांच्या 'धिंगाणा' या कादंबरीतून मांडले आहे. ग्रामीण जीवन हे रुढी परंपरा आणि आपल्या गावच्या प्रतिष्ठेला धक्का लागू नये अशी भावना पूर्वापार चालत आलेली होती. लोकशाही व्यवस्थेने आणि त्या व्यवस्थेतील लोकनेत्यांनी ग्रामीण युवकाला कशा प्रकारे वापरुन घेतले आहे याचे वास्तववादी दर्शन धिंगाणा कादंबरीतून घेतले आहे. राजन गवस यांच्या कळप (१९९७) या कादंबरीने वेगळा विषय हाताळला आहे.

समाजातील अपप्रवृत्तीवर आधारित ही कादंबरी या विरुद्ध लढणाऱ्या तरुणाची आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रात चालणाऱ्या अपप्रवृत्ती आणि त्यांच्या तिटकारा असणाऱ्या युवकाच्या जीवनाचे, त्याच्या संघर्षाचे चित्रण या कादंबरीत केले आहे. सामाजिक आणि वाङ्मयीन चळवळी या समाजाच्या प्रश्नांची तड लावण्यासाठी निर्माण झालेल्या असतात आणि या चळवळीत काही स्वार्थ साधणारी मंडळी सामील होऊन चळवळींचा आपल्या स्वार्थासाठी कसा उपयोग करतात त्याच विरोध करणाऱ्या युवकाची ही संघर्षमय गोष्ट आहे. कळप कादंबरीतून समाजात परिवर्तन घडवू पाहणाऱ्या अनेक युवकांची ही प्रतिनिधिक घुसमट आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. शिक्षणाने सजग झालेल्या समाजासाठी काही करू इच्छिणाऱ्या नव्वदच्या दशकातील युवकांची मानसिक अवस्था त्यांच्या समाजाचे सुधारक म्हणणाऱ्यांचे विविध क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या लोकांची त्या काळात समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि आशावादी युवकांचा झालेला हिरमोड या कादंबरीतून व्यक्त झाला आहे. तरुणाच्या मनाची त्याच्या कुटुंबाची आणि समकालिन समाजाची अवस्था लेखकांनी व्यवस्थितपणे मांडली आहे.

**राजन गवस यांच्या कादंबरीत आलेले राजकीय आणि सामाजिक जीवन:**

राजन गवस यांची तणकट (१९९८) ही कादंबरी समकालिन तरुणांची आगतिकता मांडणारी आहे. स्वातंत्र्यप्राप्तीला पन्नासवर्षे झाल्यानंतर आपण खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य अनुभवतो. आहोत का असा प्रश्न पडावा अशी आजच्या युवकांची स्थिती झाली आहे स्वातंत्र्याने आपल्याला समतेचा आणि न्यायाचा हक्क दिला आहे. हजारो वर्ष जातीच्या

जोखडातून दलित मुक्त झाला आहे. कायद्यासमोर सर्व समान अशी आपली राज्यघटना आपल्याला मंत्र देते. परंतु हजारोवर्ष चाललेली जात व्यवस्था आणि त्या जात व्यवस्थेने माणसाकडे बघण्याचा त्याच्याशी वर्तन करण्याचा जो पायंडा चालत आलेला होता त्याने माणसाच्या मनात खोलवर घातलेला घाव स्वातंत्र्यानंतरच्या काळात बदलेल, अशी भाबडी कल्पना करणाऱ्या अनेकांना ही कादंबरी समाजाचे वास्तव दाखविते. शहरी आणि ग्रामीण असे दोन विभाग या भारतात स्वातंत्र्यानंतर अधिक ठळक झालेले आहेत. शहरात नोकरी, व्यवसाय आणि शिक्षण या कारणांनी जातीभेद स्पष्ट दिसत नाही. शहराची म्हणून एक व्यवस्था निर्माण झाली आहे. त्यामध्ये जात आणि माणूस यांना वेगळ्या नजरेने पाहिले जात नाही. त्यामुळे लोकशाही, राज्यघटना, न्याय, समता, बंधुता या गोष्टी शहरात त्याचे स्थान वेगळे आहे. शहरात जगण्याची जीवनशैली वेगळी आहे. अर्थाजनासाठी प्रत्येकजन व्यस्त आहे. म्हणून शहरी भारत वेगळा आहे.

ग्रामीण जीवनात गावगाड्यात स्वातंत्र्याच्या पन्नासवर्षांनंतरही जात आणि माणूस या दोन्हीकडे बघण्याचा दृष्टिकोन फारसा बदलत नाही हे 'तणकट' या कादंबरीच्या माध्यमातून कादंबरीकार राजन गवस यांनी समकालिन समाजजीवनाचे सूक्ष्मपणे अवलोकन करुन त्या पद्धतीने मांडले आहे. गावगाडा हा आजच्या म्हणजे नव्वदनंतरच्या दशकात आपल्या रुढी परंपरा आणि श्रेष्ठ, कनिष्ठ, दलित या मूल्यांना महत्त्व देणारा आहे. गावातील खालच्या जातीतील (दलित) आणि शेती व्यवसाय करणारा आणि परंपरेने गावचा श्रेष्ठ असलेला सवर्ण यांच्यातील संघर्ष या कादंबरीत मांडला आहे. दलित आणि सवर्ण हा संघर्ष गावपातळीवर तसा नवीन नाही. ह्या संघर्षाला नेहमी श्रेष्ठत्व आणि कनिष्ठत्व याहीपेक्षा खालच्या जातीने वरच्या जातीशी नेहमी नमते घ्यायचे हा अलिखित नियम असतो किंवा तो परंपरेने चालत आलेला हक्कच असतो. परंतु काळ बदललेला आहे. जातीवरुन वागणूक द्यायची नाही. माणूस म्हणून समान दर्जा दिला पाहिजे ही नवी वाट ग्रामीण भागात येऊ घातली आहे. घटनेने अशा अनेक दलितांना न्याय देण्यासाठी कायद्याचे संरक्षण दिले आहे. कायद्याच्या या संरक्षणाचा वेगळया कारणासाठी वापर करणारी दलित नेते मंडळी गावागावात निर्माण झाली आणि गावात जरा काही घडले तर त्या घटनेला जातीचा रंग देवून गावातील संघर्ष ज्वलंत ठेवणाऱ्या प्रवृत्तीचा आढावा या कादंबरीत घेतला आहे.

'तणकट' या कादंबरीत गावपातळीवर दलितांवर अन्याय करणारी छोटीशी घटना सहज घडून गेली आणि त्या घटनेचे दलित नेते मंडळींनी भांडवल करुन दलितांना गावातील सवर्णाच्या विरोधात लढण्याचे बळ दिले. बाहेरुन आलेली दलित नेतेमंडळी गावातील दलितांना भडकवतात आणि पोलीस केस कोर्ट कचेऱ्या चक्रात ओढतात. गावाने दलितांवर कसा अन्याय केला, बहिष्कार टाकला, त्यांना हीन वागणूक दिली अशा न घडलेल्या घटना वर्तमानपत्रातून प्रसिद्ध करुन गावामध्ये दलित - सवर्ण संघर्ष सतत पेटता ठेवून नेतेमंडळी आपला स्वार्थ साधून घेतात. गावातील शेती व्यवसाय आणि त्यावर अवलंबून असलेली दलित मंडळी या नेत्यांच्या नादाला लागून गावातील परिस्थितीचे भान असूनही वेगळ्या पद्धतीने वागतात. त्यामुळे गावपातळीवर निर्माण

झालेल्या संघर्षाची उत्कट आणि समकालिन समाजाचे त्यांच्या वर्तनाचे बदलत्या परिस्थितीचे त्याचा फायदा घेणाऱ्याचे आणि त्यात विनाकारण भरडलेल्याचे सूक्ष्म चित्रण राजन गवस यांच्या 'तणकट' कादंबरीने केले आहे.

**निष्कर्ष :-**

१) राजन गवस यांनी १९८० नंतरच्या दशकातील ग्रामीण समाजाचे चित्रण त्यांच्या कादंबरीतून केले आहे.

२) 'चौंडक' व 'भंडारभोग' या कादंबरीतून रुढी, परंपरा, धर्मभावना यामुळे देवदासी, जोगतीन यांच्या जीवनाची होणारी वाताहात, दु:ख, भोग यांचे दर्शन घडविले आहे.

३) महाराष्ट्र कर्नाटक राज्याच्या सीमाभागात चालणाऱ्या परंपरा, प्रथा आणि समाजजीवन कादंबरीतून व्यक्त झाला आहे.

४) स्वातंत्र्यानंतर ग्रामीण तरुणाची दिशाहिनता करणाऱ्या व्यवस्थेचे चित्रण त्याच्या कादंबरीतून व्यक्त झाले आहे.

५) 'तणकट' सारख्या कादंबरीतून ग्रामीण जीवन, जातीव्यवस्था आणि त्याचा गैरफायदा घेणारी प्रवृत्ती यांचे दर्शन घडविले आहे.

६) राजन गवस यांनी १९९० नंतरचे ग्रामीण जीवन आणि त्याचे प्रश्न कादंबरीतून चित्रित केले आहे.

**संदर्भ :-**

१. कुलकर्णी मदन
मराठी प्रादेशिक कादंबरी तंत्र आणि स्वरूप
मंगेश प्रकाशन नागपूर प्र. आ. १९८४

२. गवस राजन
तणकट
साकेत प्रकाशन औरंगाबाद
द्वि.आ. २००२

३. नेमाडे भालचंद्र
टिका स्वयंवर
साकेत प्रकाशन औरंगाबाद
प्र.आ. २००१

४. देशपांडे अ.ना
आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास (खंड दुसरा)
व्हिनस प्रकाशन पुणे

***Cite This Article:***

*** गावडे प.** *(2023).* राजन गवस यांच्या कादंबरीतील समाजजीवन, ***Aarhat Multidisciplinary International Education Research Journal, XII (IV) July-Aug, 103-106.***